महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १२ वे ■ अंक क्र. – १६६ ■ शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

✲ उत्सुकता ✲




# धुळे येथे महापालिका निवडणुकीदरम्यान हिंसाचार, शिवसेना नेत्याच्या घरावर हल्ला

**दै. आवाज वृत्तसेवा...**

धुळे - येथे महापालिका निवडणुकीदरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहे. निवडणूक शत्रुत्वामुळे विविध भागात हिंसक घटना घडल्या, मतदानात अडथळा निर्माण झाला. शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलिस विभागाने अतिरिक्त पोलिस बल तैनात केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीदरम्यान धुळे येथे गेल्या ४८ तासांत मोठ्या प्रमाणात अशांतता निर्माण झाली. दोन गटांमध्ये संघर्ष झाला, त्यात ईव्हीएमचे नुकसान झाले. जमावाने शिवसेना नेत्याच्या घरावरही हल्ला केला. बिघडलेल्या परिस्थितीला प्रतिसाद म्हणून धुळे येथे अतिरिक्त पोलिस बल तैनात करण्यात आले आहे. प्रशासनाने गैरकृत्य करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आवाहन केले आहे आणि लोकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. अधिकाऱ्यांनुसार, बुधवारी संध्याकाळी देवपूर येथील कृषी वसाहतीत सुमारे २० जणांच्या जमावाने शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांच्या घरावर हल्ला केला. जमावाने घरात घुसून दगडफेक केली आणि वाहनांचे नुकसान केले. मनोज मोरे आणि भाजप नेते विलास शिंदे यांच्यात उमेदवारी मागे घेण्यावरून वाद झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. पोलिसांनी दोन्ही नेत्यांच्या समर्थकांवर दंगल आणि बेकायदेशीर जमावाचे गुन्हे दाखल केले आहे.गुरुवारी सकाळी हिंसाचाराची आणखी एक घटना घडली. प्रभाग क्रमांक १८ मधील एका शाळेत दोन गटांमध्ये हाणामारी झाली. या दरम्यान काही लोकांनी मतदान केंद्रात घुसून ईव्हीएम फोडले. या गोंधळामुळे तासाहून अधिक काळ निवडणूक प्रक्रिया थांबली. नवीन मशीन बसवल्यानंतर मतदान पुन्हा सुरू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी घटनास्थळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे आणि गैरकृत्य करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे नोंदवण्याची कारवाई सुरू आहे. महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांमध्ये गुरुवारी मतदान झाले.

# मतदानाच्या नावाखाली अनेक ठिकाणी गोंधळ

**दै. आवाज वृत्तसेवा...**

१५ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांसाठी मतदान होत असताना, राज्यभरातून अनेक ठिकाणी गोंधळ आणि तांत्रिक अडचणींच्या बातम्या समोर येत आहे. तसेच मुंबई आणि पुण्यासह अनेक ठिकाणी मतदारांनी तक्रार केली आहे की, मतदानानंतर बोटाला लावली जाणारी 'शाई' सहज पुसली जात आहे. तसेच राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर टीका केली आहे.

तसेच राष्ट्रवादी (शरद पवार गट) नेते अंकुश काकडे यांनी आरोप केला की, काही मशिन्समध्ये तीन मतदानानंतर चौथ्या वेळी लाईट लागला नाही. तसेच, मशिन्सची वेळ १४ मिनिटे पुढे असल्याचाही दावा त्यांनी केला. तर नाशिकच्या प्रभाग २४ आणि २९ मध्ये, तसेच सोलापूरच्या आयटीआय कॉलेज केंद्रावर ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने मतदान अर्धा ते एक तास उशिरा सुरू झाले. तसेच अहिल्यानगर प्रभाग ३ मध्ये बोगस मतदार पकडल्याच्या कारणावरून पोलीस आणि शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्त्यांमध्ये मोठी खडाजंगी झाली.

मालेगावमध्ये प्रभाग ९ मध्ये एका महिलेचे मत तिच्या आधीच कोणीतरी दिल्याचे समोर आल्याने तिथे मोठा गोंधळ उडाला.

तसेच शिरवणे येथील एका मतदान केंद्रात कोब्रा साप शिरल्याने मतदारांची पळापळ झाली. सर्पमित्राने सापाला पकडल्यानंतर काही काळाने मतदान पुन्हा सुरू झाले.

# जपानमधील होक्काईडो प्रांताच्या उपराज्यपालांनी घेतली कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा यांची भेट

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई : राज्यातील कौशल्य प्रशिक्षित तरुणांना जपानमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून येत्या तीन महिन्यात याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. जपानच्या होक्काईडो प्रांताचे उपराज्यपाल कानो ताकायुकी यांनी मंत्रालयात कौशल्य विकास मंत्री लोढा यांची शिष्टमंडळासह भेट घेतली.

यावेळी कौशल्य प्रशिक्षित मनुष्यबळाची जपानमध्ये मोठी मागणी असल्याच्या पार्श्वभूमीवर रोजगाराच्या संधीबाबत चर्चा करण्यात आली. कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, कौशल्य विकास विभागाचे आयुक्त डॉ. अमित सैनी, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, जपानच्या आंतरराष्ट्रीय व्यवहार विभागाचे वरिष्ठ संचालक तोशिनोरी नाईतो, परदेशी मनुष्यबळ विभागाचे संचालक ईजी यामामोटो तसेच आंतरराष्ट्रीय व्यवसाय विभागाचे संचालक माकोतो ताकाहाशी, आंतरराष्ट्रीय व्यवसाय विनिमय विभागाच्या प्रमुख हिरोए मिकामी उपस्थित होते. या बैठकीदरम्यान भाषांतराची जबाबदारी दुभाषी युका इगाराशी यांनी पार पाडली.

होक्काईडो हा जपानच्या उत्तरेकडील प्रांत असून, जपानचा जवळपास २२ टक्के भाग या प्रांताने व्यापला आहे. या प्रांतात कृषी, मत्स्य, उद्योग, बांधकाम आणि पायाभूत सुविधा तसेच नर्सिंग क्षेत्रात मनुष्यबळाची नितांत गरज आहे. त्यानुसार कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेसाठी होक्काईडो प्रांताने आंतरराष्ट्रीय भागीदारीसाठी पुढाकार घेतला आहे.

त्याचाच एक भाग म्हणून या प्रांताच्या शिष्टमंडळाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री लोढा यांची भेट घेतली.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, जागतिक स्तरावर भारतीय मनुष्यबळ क्रियाशील ठेवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा कौशल्य विकासावर अधिक भर आहे. त्यादृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील कौशल्य विभाग कार्यरत असून विविध देशांमध्ये राज्यातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने काम सुरु आहे. विद्याविहार येथील स्वामी विवेकानंद कौशल्य विकास प्रबोधनीद्वारे कौशल्य प्रशिक्षण आणि जपानी भाषेचे शिक्षण देण्याचा प्रयत्न असल्याचेही कौशल्य विकास मंत्री लोढा यांनी सांगितले.

जपानमध्ये कृषी, वैद्यकीय, विविध तंत्रज्ञ, बांधकाम आणि सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी आहे. भारतीय युवक अधिक कार्यक्षमतेने काम करत असून भारतीय कौशल्य प्रशिक्षित तरुणांना जगभरात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे होक्काईडो प्रांताचे उपराज्यपाल कानो ताकायुकी यांनी सांगितले.

***

# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या मतमोजणीप्रसंगी अडचण आली तरच 'पाडू'चा वापर

**दै. आवाज वृत्तसेवा...**




मुंबई,:बृहन्मुंबईमहानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडच्या मतदान यंत्राद्वारे झालेल्या मतदानाची मोजणी करताना काही तांत्रिक अडचण आल्यास 'पाडू' (प्रिंटींग ऑक्सिलरी डिस्प्ले युनिट) या यंत्राचा वापर करून निकाल बघण्याची सुविधा उपलब्ध आहे. मात्र पाडूचा वापर सरसकट केला जाणार नाही. तांत्रिक अडचणीच्या प्रसंगी अत्यंत अपवादात्मकरित्या त्याचा वापर केला जाईल, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडची मतदान यंत्रे केवळ बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठीच वापरली जात आहेत. ही यंत्रे भारत निवडणूक आयोगाची असून ती 'एम३ए' या प्रकारची आहेत. त्यात झालेल्या मतदानाची मतमोजणी कंट्रोल यूनिटला (सीयू) बॅलेट यूनिट (बीयू) जोडूनच करावी, फक्त तांत्रिक अडचण आली तरच अत्यंत अपवादात्मकरित्या पाडूचा वापर करावा, असे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश आहेत.बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी १४० पाडूंची उपलब्धता करून देण्यात आली आहे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत मतमोजणीसाठी पाडूची गरज भासल्यास कंपन्यांच्या तंत्रज्ञांच्या उपस्थितीत त्याचा वापर करावा. त्याचबरोबर पाडूच्या वापराबाबत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना या यंत्राचे प्रात्यक्षिक दाखविण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले होते. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना प्रात्यक्षिक दाखविले



## नांदगाव तालुक्यातील पळाशी, वेहेळगांव परिसरात बळजबरीने बसविलेल्या स्मार्ट मीटर चा वाढीव बिलाने ग्राहकांना शॉक,

# सामान्य जनतेच्या खिशाला कात्री, विरोधात आंदोलन करणार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे पळाशी प्रतिनिधी :- नांदगाव तालुक्यातील पळाशी वेहेळगाव परिसरात जबरदस्तीने बसवलेल्या स्मार्ट विद्युत मीटर चा ग्राहकांना दणका बसत असून, वीज ग्राहकांना एक महिन्याचे बिल एक ते पाच हजार रुपये पर्यंत येत असल्याने,ग्राहकांचे धाबे दणाणले आ-हेत. उखळ पांढरे होण्याची वेळ आली आहे.वेळ आली आहे.

स्मार्ट मीटर,चे अव्वाचें सव्वा वीज देयक

स्मार्ट मीटर बसवून , अवाच्या सव्वा वीज आकारणी केल्याने, पळाशी , सा-वरगाव वेहेळगाव या परिसरात वीज बिल हीसामान्य नागरिकास दोन ते पाच हजार एवढ्या रक्कमेची एक महिन्याची वीज देयक( बिल) ग्राहकांना आल्याने सामान्य जनता होरपळून निघत आहे. जुन्या सामान्य वीज मीटरचे देयक,,घरात एक दोन विजेचे दिवे , पंखा , याचे वीजबिल एकशे पन्नास, दोनशे रुपये दरम्यान येत होते.तोच वापर असताना दोन ते पाच हजार रुपये पर्यंत वीज देयक आल्याने ग्राहकांचे तोंडचे पाणी पळाले आहेत.

हे स्मार्ट मीटर नको म्हणून ओरड करणारे ग्राहकांची कोणी दखल घेत-ली नाही. खाजगी कंपनी व महावितरण कंपनीने शासनाने व महावितरण कंपनीने ही वीज मीटर हे सुस्थितीत असताना वीज ग्राहकांचे नादुरुस्त (फोल्टी) मीटर दाखवून , मीटर बदलविण्याची ग्राहकाची परवानगी न घेता, त्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसविले. नागरिकांची या स्मार्ट मीटरला विरोध असताना हुकूमशाही पद्धतीने बसविले. या मीटर मध्ये असलेली यंत्रणा मुळेच एवढे बील आले आहे असा नागरिकांचा समज आहे.

स्मार्ट मीटर बदलविण्याची,सामान्य जुने मीटर बसवण्याची मागणी

दोन तीन महिन्यापासून ग्राहकांना स्मार्ट मीटर चे देयक हे हजार ते पाच हजार रुपये पर्यंत येत असल्याने नागरिक बेजार झाले आहेत. एखाद्या कारखाना, छोटे मोठे, लघु उद्योग यांना कधी एवढे बील आले नाही, ते घरगुती वीज ग्राहकांना स्मार्ट मीटरचे बील आल्याने ग्राहकांचे धाबे दणाणले आहे. शासनाने जनतेच्या खिशाला कात्री लावली आहे. अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पस-रली असून, हे स्मार्ट मीटर काढून आमचे जुने मीटर पुन्हा बसून द्यावे अशी मागणी होत आहे.जर जुने मीटर न बसल्यास स्मार्ट मीटर बसविणाऱ्या कंपनीच्या व महावितरण विभागाच्या विरोधात नागरिक जनआंदोलन करणार आहे.

तक्रारी स्वीकारत नाही.

दरम्यान वेहेळगाव येथील शाखा उपअभियंता याच्याकडे वीज स्मार्ट मीटर देयकाबाबत, तक्रार अर्ज दाखल केला असता तो ते स्वीकारत नाही. ते म्हण-तात नांदगांव किंवा मनमाड मालेगांव येथे जाऊन द्या. ग्राहकांना असे अडचणीत आणतात.


यशवंतराव ताडगे सर

नांदगांव मालेगाव जाण्याचा खर्च ग्राहकांना पडतो.काही ग्राहक हे शेतकरी, मोलमजुरी करणारे असतात. त्यांना वीज कार्यालय नांदगाव, मालेगांव जाण्यासाठी कार्यालय माहीत नसते व काहीना आर्थिक भुर्दंड सोस-ावा लागतो. परिणामी तक्रार दाखल करू शकत नाही. आपल्या कार्यालया संबंधित तक्रार दाखल करून घेऊ शकत नाही. ही विशेष बाब म्हणावी मागेल. वरिष्ठांशी ते पत्रव्यवहार करू शकत नाही. म्हणजे वेहेळगांव येथील उपअभियंता आपली जबाबदारी टाळतात. असे दिसून येते.

वाढीव बिलाबाबत ते कमी करून देऊ असे तोंडी आश्वासन देतात. पण वीज देयक कमी होत नाही. चार पाच महिन्यापासून हा वाढीव वीज देयकाचा प्रकार सुरू आहे. वीज देयक न भरल्यास वीज पुरवठा खंडित होत आहे. या अंधारात राहण्याची वेळ मोलमजरी करणाऱ्या ग्राहकांवर आली आहे.

आर आर सी कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या मनमानी

नांदगाव तालुक्यातील पळा-शी वेहेळगाव परिसरात,विविध भागांत 'महावितरण'कडून सुस्थितीत असलेले व फोल्टी वीजमीटर काढून त्या जागी नवे स्मार्ट मीटर लावले जात आहेत. ग्राहकांना



कोणतीही पूर्वकल्पना न देता व घरी कोणी नसतानाही स्मार्ट मीटर बसविणारी ठेकेदाराची माणसे 'महावितरण'मधील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ग्राहकांवर दबाव आणून जबरदस्तीने मीटर बसवत आहेत.

वीज ग्राहकांनी तीव्र विरोध दर्शविला असून, मीटर बदलवू नये, अशी मागणी केली आहे. जुनी असलेलीच वीजमीटर पुन्हा बसविण्यात यावी अशी मागणी होत आहे.नादुरुस्त मीटरच्या नावाखा-ली संबंधित ठेकेदार व यांची नेमलेली कर्मचारी आणि वीजवितरण कंपनीचे अधिकारी हे कर्मचाऱ्यांना त्यांच्या सोबत पाठवून वीजग्राहकांची यादी पाठवून वीजग्राहकांची परवानगी न घेता सक्तीने स्मार्ट वीजमीटर बसवून गेले आहे. त्यामुळे वीजग्राहकांमध्ये. तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

कंपनीने उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खटाटोप

वीजमिटर मीटर हे नादुरुस्त दाखवून, पळाशी, वेहेळगाव , सावरगाव या गावा-तील स्मार्ट वीजमीटर बसविण्याच्या खाजगी आर आर सी कंपनीचे मॅनेजर व कर्मचारी व त्यांच्या बरोबर वीजवितरणाचे कर्मचारी आणि मानधनावर असलेले कर्मचारी यांना पाठवून स्मार्ट वीजमीटर बसविण्याच्या सपाटा चालविलेला आहे.

आर आर सी कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे ग्राहकांना अरेरावीची व उर्मट पणाची वागणूक

संबंधित ठेकेदाराची व आर. आर .सी. कंपनीचे अभियंता व कामगार ग्राहकांना यांना विचारणा ग्राहकांनी भ्रमणध्वनी द्वारे त्यांच्याकडे काही अधिकृत पत्र वगैरे आहे का? अशी विचार केली असता,दाखविले नाही. बळजबरीने स्मार्ट मीटर बसविले जात आहे. ग्राहकांना अरेरावीची भाषा आर आर सी कंपनीचे अधिकारी करीत आहे.

तसेच आर आर सी या खाजगी कंपन्या च्या व महावितरण कंपनीच्या वे-हेळगाव येथील सहाय्यक अभियंता व आर आर सी चे कर्मचारी अपमानास्पद वागणूक देतात. यांच्याशी स्मार्ट वीजमीटर बसविण्याच्या बाबतीत भ्रमणध्वनी द्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला. फोन नंबर लागूनही उचला नाही.ते नेहमी ग्राहकांशी त्यांचा संपर्क होत नाही.योगायोगाने झाला तर ते उद्धटपणे बोलतात.

मात्र या प्रकाराबाबत वीज ग्राहकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. हे स्मार्ट वीजमीटर बसविण्याची कोणतीही, जबरदस्ती व कुठलाही आदेश नसतान-ाही, स्मार्ट वीजमीटर बसविण्याच्या कंत्राट असलेल्या आर आर सी कंपनीचे ठेकेदार व महावितरणचे कर्मचारी जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवत आहे. ते नागरिकांच्या विरोधाला जुमानत नाही. घरी कोणी नसताना सुस्थितीत असलेले मीटर काढून त्या जागी नवीन स्मार्ट मीटर बसवत आहे.व नवीन मीटर पाहिजे अशी मागणी केलेल्या ग्राहकांना जुन्या पद्धतीचे वीज मीटर न बसवता स्मार्ट मीटर बसवत आहे. आर आर सी कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या या बळजबरी, जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविण्याच्या व ग्राहकांशी उर्मट पणे वागणाऱ्या कर्मचाऱ्यांना लगाम लागेल का? वाढीव वीज देयकाचा याबाबतीत न्याय मिळेल का? अशी संतापजनक प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

खुलासा करावा

स्मार्ट वीजमीटर बसविण्याच्या शासन निर्णय असल्यास तो त्यांनी वीजग्राहकांना दाखवावा. जर नसेल तर खाजगी कंपनीला महावितरण कंपनीच्या वेहेळ-गावचे सहाय्यक अभियंता अभियंता यांनी याबाबत खुलासा करावा अशी मागणी होत आहे. जर शासन आदेश नसेल तर अभियंता यांनी खाजगी कंपनीचे ठेकेदार यांना सहकार्य कोणत्या कारणाने केली आहे याचा खुलासा करावा.

जास्तीचे वीजबिल

दरम्यान, शहरात व विविध भागात ज्या-ज्या ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवले आहेत. त्यांना दुप्पट, तिप्पटीने वीजबिल आकारण्यात तीन चार महिन्यापासून सुरुवात झाली आहे. याबाबतही नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. ज्यांचे बिल महिन्याला १५० ते ५०० रुपयांपर्यंत येत होते, त्यांचे बिल आता एक ते दोन , पाच, सात, आठ हजारांपर्यंत येत असल्याने नागरिकांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली आहे. या मीटरमध्ये असलेली सिस्टीम व यातील लाईट हेच बिल वाढविण्यास कारणीभूत ठरत असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे. 'महावितरण' ने स्मार्ट मीटरच्या माध्यमातून नागरिकांच्या खिशाला हात घातला असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम त्वरीत थांबवावी . बसविलेले स्मार्ट वीजमीटर त्वरीत काढण्यात यावे. जुने मीटर बसविण्यात अशी मागणी होत आहे.

आंदोलन करणार

यासंदर्भात वीज कंपनीने गांभीर्याने दखल न घेतल्यास तीव्र जन आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनीयापूर्वी दिला होता. परंतु सकारात्मक काही बदल होईल अशी अपेक्षा बाळगून वीज ग्राहक होते. दोन तीन महिने उलटूनही जादा वीज देयक आल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पस-रली आहे. एवढे वीज देयक डोळे पांढरे होण्याची वेळ आली आहे.

दरम्यान, यासंदर्भात शिवसे-नेचे आमदार सुहास कांदे यांना माहिती दिली जाणार असून. स्मार्ट वीजमीटर बसविण्याच्या सपाटा लावणाऱ्या खाजगी कंपनी व महावितरण कंपनीच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे ग्राहकांकडून सांगण्यात येत आहे.

आता स्थानिक निवडणुका घेण्यात येणार असल्याने शासनाने या कडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास, त्याचा परिणाम निवडणुकीच्या मतदानावर होणार असल्याचे बोलले जात आहे.

## जिल्हा युवा पुरस्कारासाठी १९ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई, दि. १५ : आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक-युवतींमुळे समाजात युवाशक्तीची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. युवकांना मानव संसाधन विकासाचा प्रमुख स्रोत मानले जात असून विकास प्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. या अनुषंगाने राज्याच्या युवा धोरण २०१२ नुसार राज्य व जिल्हास्तरावर युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

मुंबई शहर जिल्ह्यातील पात्र युवक, युवती व संस्थांनी २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीसाठी जिल्हा युवा पुरस्कारासाठी १९ जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन मुंबई शहराचे जिल्हा क्रीडा अधिकारी मार्क धरमाई यांनी केले आहे.

पुरस्कारासाठीचे अर्ज भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल, दुसरा मजला, जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई शहर कार्यालय, धारावी येथे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती-जमाती, आदिवासी भाग, तसेच शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, संस्कृती, कला, क्रीडा, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग, महिला सक्षमीकरण, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध, व्यसनमुक्ती आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक, युवती व संस्थांना जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी ९५९४३६९५६१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

****

## मानूर येथील आदर्श टेक्निकल औद्योगिक प्रशिक्षण केंद्र येथे स्वामी विवेकानंद ,राजमाता जिजाऊ जयंती साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

कळवण प्रतिनिधी / महेश कुवर

कळवण तालुक्यातील आदर्श टेक्निकल एज्युकेशन सोसायटी कळवण संचलित स्वामी विवेकानंद औद्योगिक प्रशिक्षण केंद्र मानुर येथे स्वामी विवेकानंद , राजमाता जिजाऊ जयंती मोठ्या उत्स-ाहात साजरा करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष दगडू रामचंद्र सोनवणे यांच्या शुभ हस्ते विद्येची देवता माता सरस्वती, जिजाऊ माता, स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. या प्रसंगी शिक्षक शरद गांगुर्डे यांनी स्वामी विवेकानंद आणि जिजाऊ माँसाहेब यांच्या विचारांवर प्रकाश टाकला. युवकांनी आपल्या जीवनामध्ये स्वामी विवेकानंदांचा आदर्श घेऊन राष्ट्रकार्य करावे तसेच महिलांनी जिजामातेच्या जीवनातील प्रसंगातून आदर्श स्त्री कशी



असावी, यासंदर्भात विषय मांडणी केली. तसेच शिक्षक वामन गावित यांनी स्वामी विवेकानंद यांचा जीवन कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. स्वामी विवेकानंदांच्या जीवन कार्याचा अभ्यास करा. त्यांच्या ठिकाणी सर्व काही सकारात्मक आणि विधायक आहे. काही नकारात्मक नाही. असे सांगत स्वामी विवेकानंदांचे विविध कथाभाग कथन केले.

अनेक विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद , राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल आ-पले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दगडू रामचंद्र सोनवणे हे होते या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सचिव हितेश सोनवणे, शिक्षक शरद गांगुर्डे , वामन गावित , शिक्षिका निकिता जाधव , पत्रकार महेश कुवर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वामन गावित सर यांनी केले तर आभार प्रदर्शन निकिता जाधव यांनी केले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मताशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात ‘राज्य क्रीडा दिन’ उत्साहात साजरा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव (प्रतिनिधी) : भारतीय कुस्तीला जागतिक पटलावर ओळख मिळवून देणारे पहिले ऑलिम्पिक पदक विजेते खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या जयंतीनिमित्त मविप्र समाज संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल नांदगाव विद्यालयात 'राज्य क्रीडा दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापिका ज्योती काळे, उपमुख्याध्यापक दिपक चव्हाण, पर्यवेक्षक अविनाश शेवाळे यांच्या हस्ते खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली.

क्रीडा शिक्षक प्रशांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना खाशाबा जाधव यांचा संघर्ष आणि १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमधील त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल माहिती दिली. जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर सामान्य कुटुंबातील मुलगाही जगावर नाव कोरू शकतो, असा संदेश त्यांनी यावेळी दिला. महाराष्ट्र सरकारने २८ ऑगष्ट २०२३ पासून ' राज्य क्रीडा दिन ' सुरू केला.

या दिनाचे औचित्य साधून विद्यालयात विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने खो-खो, लंगडी, धावणे यांसारख्या मैदानी खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

मुख्याध्यापिका ज्योती काळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, केवळ अभ्यासातच नव्हे, तर खेळातही विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवणे आवश्यक आहे. खेळामुळे शिस्त, सांघिक भावना आणि आरोग्य उत्तम राहते. खाशाबा जाधव हे महाराष्ट्राच्या मातीतील एक प्रेरणास्थान आहेत.

याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# मुखेडला पर्यावरण जनजागृतीसाठी भव्य प्रभातफेरीचे आयोजन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी मुखेड ता.येवला येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पर्यावरण जनजागृतीसाठी प्रभातफेरीचे आयोजन मंगळवार दि.१३ रोजी करण्यात आले होते.विद्यार्थ्यांनी झाडे लावा-झाडे जगवा,हरित पृथ्वी-सुखी पिढी,झाडे लावा झाडे जगवा-हिरवी धरती पुन्हा सजवा, निसर्ग वाचवा -भविष्य वाचवा, स्वच्छ हवा स्वच्छ पाणी-निरोगी जिवनाची निशाणी,झाडे लावा-जीवन वाचवा आदी विविध पर्यावरण जनजागृती बाबतचे घोषवाक्यांनी परिसर दुमदुमून टाकला होता. ज्येष्ठ शिक्षक दिलीप खताळ यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणा संदर्भात माहिती दिली.पर्यावरण संवर्धनाची प्रतिज्ञा दिली.मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजा न वापरण्याची विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा घेतली. प्राचार्य महेंद्र भगत, पर्यवेक्षक संजय गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरण जनजागृती प्रभातफेरी प्रसंगी रावसाहेब आहेर, सुनील आहेर, चंद्रकांत वाघ, पोलिस पाटील मनोज आहेर,विजय जाधव,माधव दराडे, सतिश आहेर,दिलीप खताळ, आप्पासाहेब बडवर, शुभांगी धरम, विजयकुमार दुकळे, काकाजी साताळकर, राजेंद्र बोराळे, कौतिक पवार, बापूसाहेब वाघ, हेमलता पाटील, अजित शिंदे,नितीन आव्हाड, आनंदा जाधव, भानुदास मगर, योगेश महाले, उल्का लोकरे, सविता बलकवडे, अनिता दुकळे, संजय भांगरे, रविंद्र आहिरे, सोमनाथ कारे,शाम शिंदे ,आकाश आहेर, अहिल्याबाई शेळके,वर्षा बडवर , ललिता सहज, उज्वल पुराणिक आदी उपस्थित होते.

# पिंपळखुटे तिसरे येथे म्हसोबा महाराज यात्रा उत्साहात संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येवलातालुक्यातील पिंपळखुटे तिसरे या गावातील जागृत देवस्थान श्री म्हसोबा महाराज यात्रा उत्सव रथाचे मानकरी दिगंबरराजेद्र सानप यांना देण्यात आला यावेळीशाकबरी बॅड द्वारे मिरवणूक उत्सवात पार पडली आयोजन यात्रा कमिटीने केले आहे असून नाशिक व जळगाव जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान श्री म्हसोबा महाराज असून नवसाला पावणारा दैवत असल्याने शेकडो बोकड बळी या ठिकाणी झाली आहेया ठिकाण परिसरातील व बाहेरील नोकरी निमित्त गेलेल्याभाविकांनी येऊन म्हसोबाच्या चरणीत लीन झाले मिरवणूक व दिवसभरात भाविकांचे नवसाचे कार्यक्रम व संध्याकाळी करमणुकीसाठी दोन दिवस तमाशे मंडळाचे आयोजन केले होते, अष्टपटु कुस्ती पहिलवान यांची दगंल भरविण्यात आल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष संजय घुगे,माजी सरपंच धनराज पालवे, अंबादास मुंढे भाकचंद घुगे, बाळनाथ सानप, राजाराम मुंढे पोलीस पाटील, दशरथ घुगे,सुहास मुंढे ,योगेश मुंढे,अनिल मुंढे,दिगंबर सानप, गणेश बोडके, सागर सोनवणे,सागर घुगे, विशेष सहकार्य गावातील पोलीस ,आर्मी,राज्य राखीव पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा दल,महाराष्ट्र होमगार्ड, गावातील समस्त ग्रामस्थ,श्री.म्हसोबा महाराज हे श्रद्धास्थान महाराष्ट्रात प्रसिद्ध असून म्हणून नवसाला पावणारा म्हसोबा म्हणून येथील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. या यात्रेत प्रत्येक घरातून एक बोकड बळी दिले जात असल्याची चर्चा आहे म्हणून म्हसोबा महाराज जागृत देवस्थान असल्याचे बोलले जात आहे परिसरात नव्हे तर तालुक्यात सर्वात मोठी यात्रा भरवली जात आहे



# पिंपळगाव लेप शाळेत आग रोखविण्यासाठी विद्यार्थ्यांनी केले प्रात्यक्षिक

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपकढोकळे,पिंपळगावलेप:प्रतिनिधी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत आपत्ती व्यवस्थापन उपक्रमांतर्गत प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

घरात किंवा परिसरात आग लागल्यानंतर काय करावे.या समस्येचे विद्यार्थ्यांना अकलन होण्यासाठी या संदर्भातील प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले.आग लागल्यावर स्वतः काय करावे,कोणती खबरदारी घ्यावी. स्वतःचा जीव कसा वाचावा यासंबंधी संपूर्ण माहिती देण्यात आली.तसेच आग विझवण्यासाठी कोणते प्रयत्न करावे.या संदर्भातील माहिती देण्यात आली.



विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन सर्व माहिती समजून घेतली.व अवस्था आपत्ती व्यवस्थापना संदर्भात काय करावे याबद्दल त्यांच्या मनामध्ये जाणीव करून देत जागृती करण्यात आली.याप्रसंगी मुख्याध्यापक जालिंदर सोनवणे, शिक्षक संतोष गायकवाड, नहिम मन्यार, संजय वर्षे, सुर्यभान पैठणकर, शीतल सानप, यांच्यासह शिक्षक तसेच विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

# मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी !

**दै. आवाज वृत्तसेवा...**

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना ‘हिंद-दी-चादर’ म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.

अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याने प्रभावीत होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना ‘तेगबहादुर’ हे नाव दिले, ज्याचा अर्थ ‘तलवारीचा धनी’ असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धर्माचे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांची नववे गुरु म्हणून




नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले.

१७ व्या शतकामध्ये तत्कालिन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व अध्यामिक अस्मितेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबूत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने ‘हिंद-दी-चादर’ ठरले.

गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी १५ रागांमध्ये रचलेले ११६ शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन २०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नामवंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.

त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी ३५० वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम ७ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. आता दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे.

या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरूंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

**अलका पाटील**
**उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड**

# चाळीसगाव नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी हर्षल चौधरी यांची बिनविरोध निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**

यशवंतराव ताडगे ,चाळीसगाव प्रतिनिधी:- चाळीसगाव नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी हर्षल चौधरी व भाजपाचे तीन व लोकनेते अनिलदादा देशमुख शहर विकास आघाडीचे एक असे चार जणांची स्विकृत नगरसेवक म्हणून यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नगरपालिकेच्या निवडणुकीनंतर पहिल्या झालेल्या विशेष बैठकीत नगराध्यक्ष प्रतिभा चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

चाळीसगाव नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर १३ जानेवारी बुधवारी रोजी झालेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेत उपनगराध्यक्षपदी भाजपाचे हर्षल चौधरी यांचा एकमेव अर्ज आल्याने पीठासन अधिकारी यांनी हर्षल चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली, तर स्वीकृत सदस्य म्हणून लोकनेते अनिलदादा देशमुख शहर विकास आघाडीचे घृष्णेश्वर पाटील तर भाजपाचे भूषण भोसले, माजी नगरसेवक रामचंद्र जाधव व मोहित बजाज याची बिनविरोध सर्वानुमते निवड करण्यात आली.

चाळीसगाव नगरपरिषदेची उपनगरध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांची निवड लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. प्रतिभा मंगेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३जानेवारी बुधवार रोजी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास सर्वसाधारण सभेस सुरवात होऊन , सर्वसाधरण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

यावेळी नगरपालिका मुख्याधिकारी सौरभ जोशी, उपमुख्याधिकारी श्री पारधे यांच्यासह सभा आदिष्ठता सचिन निकुंभ, भाजपा व शहर विकास आघाडीचे व अपक्ष

सर्व नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होत्या.

उपनगराध्यक्षपदासाठी भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक हर्षल चौधरी यांचा एकमेव अर्ज सकाळी ११ वाजता दाखल झाल्याने ,त्यामुळे त्यांची. उपनगरध्यक्षपदी बिनविरोध निवड पीठासन अधिकारी यांनी घोषित केली.

चाळीसगाव नगरपालिकेत भाजपाचे २४ तर शहर विकास आघाडीचे १० आणि अपक्ष २ असे संख्याबळानुसार स्वीकृत नगरसेवकांच्या नावांची घोषणा करण्यात आली. भाजपाचे तीन , आघाडीचे एक असे चार स्विकृत नगरसेवक बिनविरोध निवडून आले.

भारतीय जनता पार्टीचे नगरपालिका निवडणूकीत सर्वाधिक २४ नगरसेवक , हे भाजपाचे संख्याबळ असल्याने , भाजपचे आमदार मंगेश चव्हाण व लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रतिभा पाटील त्यांच्या मार्गदर्शनाने तीन स्वीकृत नगरसेवकांची नावे जाहीर करण्यात आली, त्यात सनदी लेखापाल भूषण भोसले, मोहित बजाज तसेच माजी नगरसेवक रामचंद्र जाधव यांची नामनिर्देशित पत्र चाळीसगावचे प्रांताधिकारी प्रमोद हिले यांच्याकडे मंगळवार रोजी करण्यात दाखल करण्यात आली होती.

स्वीकृत नगरसेवक व उपनगराध्यक्ष यांच्या नावांची मंजूरी, व घोषणा नगरपालिकेच्या बोलावलेल्या विशेष सभेत, लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रतिभा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.

लोकनेते कै.अनिलदादा देशमुख शहर विकास आघाडीचे १० नगरसेवक निवडुन आल्यामुळे त्यांच्यावतीने एकमेव माजी नगरसेवक घृष्णेश्वर पाटील यांचे नाव नामनिर्देशित केल्याने त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

जल्लोषात मिरवणूक –

उपनगराध्यक्षासह स्विकृतनगरसेवकांची निवड झालेल्यानंतर सभागृहाच्या बाहेर सभा संपन्न झाल्यानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोषात मिरणूक काढण्यात आली. यात भाजपाच्या कार्यकर्त्यांची वेगळी मिरवणूक काढत, आ. मंगेश चव्हाण यांची भेट घेतली. आमदार मंगेश चव्हाण यांनी नवनियुक्त सर्वांना शुभेच्छा दिल्यात.

विकास आघाडीतर्फे घृष्णेश्वर पाटील यांची जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. या मिरणूकीत माजी खा. उन्मेष पाटील, नगरसेवक अभिषेक देशमुख, गटनेते दिपक पाटील यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते.

स्वीकृत नगरसेवक घृष्णेश्वर पाटील, भूषण भोसले, रामचंद्र जाधव, मोहित बजाज

पत्रकारांसाठी बैठक व्यस्थेसाठी आश्वासीत उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांची निवड झाल्यानंतर सभागृहात पत्रकारांना बसण्यासाठी योग्य अशी जागा नसल्याचा मुद्दा स्वीकृत नगरसेवक घृष्णेश्वर पाटील यांनी उपस्थित केला असता, मुख्याधिकारी सौरभ जोशी यांनी त्याची दखल घेत पुढील बैठकीत पत्रकारांसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण केले जाईल असे सांगितले. शक्य तो सभागृहात स्वतंत्र पत्रकार कक्षाची व्यवस्थात करण्यात येणार असल्याचे यावेळी मुख्याधिकारीसह नगराध्यक्ष प्रतिभा चव्हाण यांनी आश्वासीत केले.

चाळीसगाव नगरपरिषद उपनगराध्यक्ष पदी भाजपातर्फे हर्षल चौधरी तर ३ जणांना स्वीकृत नगरसेवक पदाची संधी,

आमदार मंगेश चव्हाण यांनी विविध क्षेत्रातील अनुभवी मान्यवरांना संधी देत स्वीकृत नगरसेवक पदाची राखली गरिमा..!

चाळीसगाव – गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा असणाऱ्या चाळीसगाव नगरपरिषद उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांची निवड आज करण्यात आली. आमदार मंगेशदादा चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाला लोकनियुक्त नगराध्यक्ष पद व २४ नगरसेवकांचे भरभक्कम बहुमत मिळाल्यानंतर लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.प्रतिभाताई चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आज चाळीसगाव नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत उपनगराध्यक्ष पदी भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक हर्षल चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर भारतीय जनता पक्षाच्या कोट्यातून जे ३ स्वीकृत नगरसेवक निवडले जाणार होते त्यात १) प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट श्री. भूषण सदाशिव भोसले, २) माजी नगरपरिषद शिक्षण सभापती व ज्येष्ठ श्री. रामचंद्र जाधव, ३) सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक श्री. मोहित बजाज यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. या निवडीबद्दल आमदार मंगेशदादा चव्हाण व लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.प्रतिभाताई चव्हाण यांनी अंत्योदय कार्यालयात नवनियुक्त उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवक यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष नितीन पाटील, निवडणूक प्रभारी प्रा.सुनील निकम, माजी प.स.सभापती संजय पाटील, प्रदेश कार्यकारणी सदस्य के.बी.साळुंखे, माजी जि.प.सदस्य राजेंद्र राठोड, गटनेते प्रशांत कुमावत यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांच्या वतीने या निवडीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार आमदार मंगेशदादा चव्हाण यांना देण्यात आले होते. आज आमदार मंगेश चव्हाण यांनी या निवडीच्या माध्यमातून विविध समाजघटकांना न्याय व सामाजिक क्षेत्रात कामाचा अनुभव असणाऱ्या मान्यवरांना संधी दिली आहे. हर्षल चौधरी यांच्या रूपाने भारतीय जनता पक्षाच्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे काम करणाऱ्या तेली समाजातील तरुण कार्यकर्त्याला थेट उपनगराध्यक्ष पदाची संधी मिळाल्याने पक्षात देखील एक चांगला संदेश त्यांनी दिला आहे

तर जळगाव जिल्ह्यातील जेष्ठ नेते स्व. स.वा.पाटील यांचे सुपुत्र सी.ए.भूषण भोसले यांच्या रूपाने चाळीसगाव नगरपरिषदेच्या इतिहासात प्रथमच चार्टर्ड अकौंटंट यांना स्वीकृत नगरसेवक पदाची संधी मिळाली आहे. नगरपरिषदेत शिक्षण सभापती असताना उल्लेखनीय कामगिरी करणारे माजी नगरसेवक व जेष्ठ आंबेडकरी कार्यकर्ते रामचंद जाधव तसेच रोटरीच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारे उद्योजक मोहित बजाज यांची स्वीकृत नगरसेवक पदी भाजपतर्फे निवड करण्यात आली आहे. स्वीकृत नगरसेवक पदाचा मूळ उद्देश साध्य करत या निवडीच्या माध्यमातून आमदार मंगेश चव्हाण यांनी त्या पदाची एकप्रकारे गरिमा वाढविली आहे.

शहराला अधिक सक्षम, समृद्ध व विकासाभिमुख बनविण्यासाठी काम करा – आमदार मंगेश चव्हाण यांचे आवाहन

चाळीसगाव नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी व स्वीकृत नगराध्यक्षपदी निवड झालेल्या सर्वांचे मनपूर्वक अभिनंदन. आपल्या अनुभव, कार्यकुशलता व समाजाभिमुख दृष्टिकोनातून चाळीसगाव शहरातील सर्व समाजघटकांना न्याय देत, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान देतील, असा मला पूर्ण विश्वास आहे. चाळीसगावच्या प्रगतीसाठी, नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी आणि शहराला अधिक सक्षम, समृद्ध व विकासाभिमुख बनविण्यासाठी सर्वजण एकत्रितपणे काम करतील, यासाठी त्यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो अशी प्रतिक्रिया आमदार मंगेश चव्हाण यांनी यावेळी दिली.

# ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी नांदेड जिल्ह्यात विविध उपक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदेड, दि. १५ : श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त हिंद दी चादर हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमाच्या व्यापक प्रचार-प्रसिद्धीसाठी जिल्ह्यात शालेय स्तरावर विविध स्पर्धांच्या माध्यमांतून जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये निबंध, चित्रकला, वक्तृत्व तसेच ‘हिंद दी चादर’ या विषयावरील डॉक्युमेंट्री, चित्रपट व गीतांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्याग, बलिदान व धर्मनिष्ठेचा संदेश देण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या अनुषंगाने लोहा तालुक्यातील पेनूर येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे चित्रकला व निबंध स्पर्धा घेण्यात आली तसेच चित्रफित दाखविण्यात आली. कंधार तालुक्यातील फुलवळ केंद्रांतर्गत असलेल्या जि. प. शाळेत चित्रकला व भाषण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जैतापूर व जि.प. प्राथमिक शाळा रहाटी बु. येथे हिंद दी चादर ही माहितीपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. जि.प. केंद्र प्राथमिक शाळा चिखली, जि.प.



केंद्र प्राथमिक शाळा कौठा व जि.प. कन्या शाळा कौठा (ता. कंधार) येथील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या महान कार्याची माहिती देण्यात आली.

जि.प. नवीवाडी, जि.प. प्राथमिक शाळा बळीरामपूर (केंद्र वसरणी), जि.प. प्राथमिक शाळा ब्राह्मणवाडा तसेच जिल्हा परिषद हायस्कूल भायेगाव येथे हिंद दी चादर गीत व व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काकांडी येथे हिंद दी चादर गीत व कथा सादरीकरण टीव्हीच्या माध्यमातून सादर करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद नागापूर व जि.प. प्राथमिक शाळा तुप्पा येथे विद्यार्थ्यांना हिंद दी चादर चित्रपट दाखविण्यात आला.

या कार्यक्रमाच्या व्यापक प्रचार व प्रसिद्धीसाठी जिल्ह्यातील सर्व शाळा, आश्रमशाळा व महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक व जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. जनजागृती मोहीम १५ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. २५ जानेवारी २०२६ पर्यंत शाळांमधील परिपाठाच्यावेळी श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या कार्यावर आधारित गीतांचे सादरीकरण करण्याबाबत सूचना निर्गमित,डॉक्युमेंटरी प्रदर्शन, घोषवाक्याचा प्रसार : हिंद दी चादर- श्री गुरु तेग बहादुर तालुकास्तरीय स्पर्धा (१५ ते १७ जानेवारी २०२६) चित्रकला स्पर्धा, गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे २० जानेवारी २०२६ रोजी गुरु ग्रंथसाहेबजी भवन, सचखंड पब्लिक स्कूलजवळ हिंगोली गेट, नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये सहभागाची संधी असून, जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना मुख्य कार्यक्रमाच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येणार आहे. हिंद दी चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीद्वारे आजपासून जिल्हाभर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

वाढदिवस शुभेच्छा, निवड/ नियुक्ती शुभेच्छा जाहिरात,
जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री,
उद्घाटन सोहळा जाहिरात
तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा
सवलतीच्या दरात
* संपर्क *
९५४५९ १०१७७/८९९९९ २१९९४

